मिळणार नाही.

-रोहित जयवंत, ठाणे.

लोकसत्ता १४।६।१८ पा.क्र. ६

# कामोठे येथे राष्ट्रीय परिषद साजरी

**नवी मुंबई :** कामोठे, नवी मुंबई येथील एम.जी.एम. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयात दोन दिवसांच्या 'इंटिग्रेटिंग ह्युमन व्हॅल्यूज् इन प्रोफेशनल एज्यूकेशन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचे उद्‌घाटन अखिल भारतीय श्री सत्यसाई सेवा संस्थेचे अध्यक्ष निमिश पांड्या यांच्या हस्ते झाले. मानवी मूल्यांची अंमलबजावणी स्वतःपासून केल्यास आपल्या व्यवसायाचे आणि देशाचे भले व्हायला वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन पांड्या यांनी केले. चांगल्या शिक्षणाबरोबरच सत्य, धर्म, शांती, प्रेम, अहिंसा ही मानवी मूल्येही अंगी बाणविणे आवश्यक असल्याचे श्री सत्यसाई सेवा संस्थेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रमेश सावंत यांनी सांगितले. संस्थेचे महासंचालक डॉ. के. जी. नारायणखेडकर यांनी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यामागील उद्देशाविषयी माहिती दिली. हैदराबाद येथील श्रीमंनारायण रामानुज चिन्ना जीयार स्वामी यांनीही या वेळी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. मुरलीधर राव, कल्याणरामन, काझी, एम.जी.एम. हेल्थ विद्यापीठाचे प्राध्यापक आणि डॉक्टर्स, शैक्षणिक, संशोधन संस्थांमधील तज्ज्ञ उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. नारायणखेडकर यांनी प्रास्ताविक केले.